IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वर : स्त्री-मुक्ति एक मध्ययुगीन संकल्पना

**डॉ. उद्धव नरहरी कांबळे**

सहायक प्राध्यापक ( तत्त्वज्ञान )

वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,नागपूर

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*महात्मा,*

**ABSTRACT**

स्त्रीमुक्ति, स्त्रीमुक्ति चळवळ, स्त्रीमुक्ति आंदोलन इत्यादी शब्दप्रयोग अलिकडे सर्रास केले जात आहेत. तथापि या संकल्पना, ही चळवळ फार जुनी आहे. भारतीय समाजव्यवस्थेत तर या संकल्पनांना या चळवळींना तसेच त्यांच्या प्रयत्नांना मध्ययुगापासून म्हणजे १२ व्या शतकापासून विशिष्ट पार्श्वभूमी लाभलेली आहे. यावर भाष्य करताना डॉ. सरोजिनी शिंत्री म्हणतात, "अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्कांबद्दल प्रयत्न केले; परंतु धार्मिक क्षेत्रातसुद्धा त्यांना हक्क मिळावा म्हणून कोणी विशेष प्रयत्न केले नाहीत. केवळ बसवेश्वरांनीच हे जाहीर केले की स्त्रियांसुद्धा धार्मिक क्षेत्रात पुरुषांइतक्याच हक्कदार आहेत. आजही स्त्रियांवर जेथे अनन्वित अत्याचार होतात, तेथे त्या काळी बसवेश्वरांनी स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी केवढा प्रखर लढा दिला असेल याची कल्पना येते. सर्व क्षेत्रांत स्त्रिया यशस्वी होऊ शकतात, हे सिद्ध झाले. काही क्षेत्रांत त्या पुरुषांपेक्षा काकणभर सरस ठरतात हेही सिद्ध झाले आहे. बसवेश्वरांनी हे जाणले होते; म्हणूनच स्त्रीमुक्तिची चळवळ त्यांनी सुरू केली आणि त्यात ते यशस्वीही झाले. "

***Plagiarism Check Report:***

Date of Report: March 01, 2026

Similarity Index: 4%

Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Kamble, Uddhav Narhari.** (2025). महात्मा बसवेश्वर : स्त्री-मुक्ति एक मध्ययुगीन संकल्पना. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **485–489.**

**प्रस्तावना :**

स्त्रीमुक्ति, स्त्रीमुक्ति चळवळ, स्त्रीमुक्ति आंदोलन इत्यादी शब्दप्रयोग अलिकडे सर्रास केले जात आहेत. तथापि या संकल्पना, ही चळवळ फार जुनी आहे. भारतीय समाजव्यवस्थेत तर या संकल्पनांना या चळवळींना तसेच त्यांच्या प्रयत्नांना मध्ययुगापासून म्हणजे १२ व्या शतकापासून विशिष्ट पार्श्वभूमी लाभलेली आहे. यावर भाष्य करताना डॉ. सरोजिनी शिंत्री म्हणतात, "अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्कांबद्दल प्रयत्न केले; परंतु धार्मिक क्षेत्रातसुद्धा त्यांना हक्क मिळावा म्हणून कोणी विशेष प्रयत्न केले नाहीत. केवळ बसवेश्वरांनीच हे जाहीर केले की स्त्रियांसुद्धा धार्मिक क्षेत्रात पुरुषांइतक्याच हक्कदार आहेत. आजही स्त्रियांवर जेथे अनन्वित अत्याचार होतात, तेथे त्या काळी बसवेश्वरांनी स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी केवढा प्रखर लढा दिला असेल याची कल्पना येते. सर्व क्षेत्रांत स्त्रिया यशस्वी होऊ शकतात, हे सिद्ध झाले. काही क्षेत्रांत त्या पुरुषांपेक्षा काकणभर सरस ठरतात हेही सिद्ध झाले आहे. बसवेश्वरांनी हे जाणले होते; म्हणूनच स्त्रीमुक्तिची चळवळ त्यांनी सुरू केली आणि त्यात ते यशस्वीही झाले. "

बसवेश्वरांनी कित्येक युगांपासून अनेक प्रकारच्या बंधनात जखडून ठेवलेल्या स्त्रियांना समता, स्वतंत्रता व समाजाधिकार मिळवून दिले. बसवेश्वरांचे हे कार्य स्त्रीजगताच्या दृष्टीने तसेच सामाजिक दृष्टीने क्रांतिकारक ठरले आहे. यावर भाष्य करताना डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, "भारतीय समाजात स्त्रीच्या कपाळी शतकानुशतके गुलामगिरीच लिहिली गेली. माता, भगिनी, पत्नी आणि कन्या या नात्यांनी पुरुषांच्या जीवनात वावरणारी स्त्री नेहमीच पुरुषापेक्षा कनिष्ठ प्रतीची मानली गेली. स्त्रीचा उल्लेख प्राचीन काळापासून शूद्रांच्या बरोबरीनेच केला गेला. धर्माच्या नावाखाली तिच्यावर बंधने घालण्यात आली होती. स्त्रीच्या जीवनाला, स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला पुरुषाइतकीच प्रतिष्ठा आहे. पुरुषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी दर्जाची असत नाही. स्त्री-पुरुष समान आहेत, असा उद्घोष बसवेश्वरांनी केला आणि स्त्रीच्या ठायी असलेल्या शक्तीची, बुद्धीची, प्रतिमेची व कर्तृत्वाची जाणीव साऱ्या समाजाला करून, दिली. सुधारलेल्या युरोप खंडातदेखील अलिकडेच स्त्री-पुरुषांची समानता मान्य करण्यात आली, पण १२व्या शतकात स्त्रीच्या भोवती उभारण्यात आलेली अशास्त्रीय व अधार्मिक कुंपणे मोडून काढून स्त्रीमुक्तीचा नवा विचार रचनात्मक दृष्टिकोनातून मांडणारे बसवेश्वर काळाच्या कितीतरी पुढे पाहू शकत होते, याबद्दल संशय उरत नाही. "

**स्त्री-स्वातंत्र्याची सनद:**

बसवेश्वरांच्या स्त्रीविषयकच्या विशेष प्रागतिक दृष्टिकोनाबाबत ते पुढे म्हणतात, "बसवेश्वरांची स्त्रीविषयक दृष्टी म्हणजेच स्त्रीच्या स्वातंत्र्याची सनद आहे. स्त्रियांच्या उन्नतीची चळवळ १९ व्या शतकात इंग्रजांच्या राजवटीत सुरू आली असे आपण मानतो, पण आठ शतकांपूर्वी स्त्री-पुरुषांच्या समानतेची ग्वाही फिरवून स्त्रीच्या भोवती बांधण्यात आलेल्या गलामगिरीच्या भिंती बसवेश्वरांनी कणखरपणे पाडून टाकल्या. ध्ययुगीन समाजव्यवस्थेत स्त्री-स्वातंत्र्याची पताका बसवेश्वरांशिवाय अन्य कुणी फडकावली नाही. "१७ 'दि टाइम्स ऑफ इंडिया'च्या अग्रलेखातदेखील असे म्हटले आहे, "बसवेश्वरांच्या चळवळीचे हे वैशिष्ट्य आहे की त्यांच्यापूर्वी जरी अनेकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न केलेले असले तरी बसवेश्वरांनी त्या काळी अतिसाहस दाखवून स्त्रीमुक्ति तसेच सुधारणा यांसाठी प्रचंड कार्य केले... बालविवाह, विधवांची गुलामगिरी, स्त्रियांची उन्नती इत्यादींबाबत त्यांनी विधायक व तेजस्वी प्रयत्न केले. आजसुद्धा प्रत्येक वर्षी या विषयावर परिषदा होतात. तरी बसवेश्वरांच्या तुलनेत त्या नगण्य आहेत."

**स्त्री आणि धर्म:**

स्त्री आणि धर्म यांचा अन्योन्य संबंध असतो. मात्र सर्व धर्मांनी स्त्रियांना समान धार्मिक स्वतंत्रता हक्क, अधिकार दिलेले नाहीत. स्त्रियांना धर्मविषयक बाबींमध्ये समानता देण्याबाबत बहुतेक धर्मांनी हयगय केलेली आहे. कोणते ना कोणते धार्मिक अधिकार स्त्रियांना न देण्याचा कटाक्ष धर्मांनी बाळगलेला आहे. तथापि लिंगायत धर्म याबाबतीत अपवाद ठरतो, कारण लिंगायत धर्माने स्त्रियांना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. डॉ. डेव्हिड मंडेलबाम यांनी म्हटल्याप्रमाणे, "लिंगायतांनी आपल्या समानतेच्या धारणेची व्याप्ती एवढी वाढविली की त्यांनी स्त्रियांनादेखील धार्मिक बाबतीत समानतेचे स्थान दिले हे विशेष होय. " हे स्वातंत्र्य देत असताना पुरुष व स्त्री, विधवा व अविधवा, श्रीमंत व गरीब असा फरक लिंगायत धर्म करीत नाही. 'पारमेश्वरागम' या ग्रंथात या संदर्भातील एक श्लोक उद्बोधक आहे,

"न बालवृद्धभेदोऽस्ति नमस्कारदि पूजने
सर्वेपि वंदनीया हि विधवाः पुष्पिणीमुखा, "

लिंगायत धर्मात आणि समाजात स्त्रिला पूजास्वातंत्र्य दिलेले आहे. इष्टलिंग धारणा, विभूति धारणा, रुद्राक्ष धारणा व एकूण धर्माचरण स्त्री व पुरुषांसाठी समान आहे. या संदर्भात श्रीनिवास मूर्ति आणि रामकृष्णन म्हणतात, "बसवांनी प्रचारात आणलेल्या धर्माने स्त्री व पुरुष यांच्यात समानतेचा पाया घातला. त्यामध्ये ईश्वरी कृपा प्राप्त होण्यासाठी 'लिंग' आधारे भेदभाव नव्हता. सांप्रत काळी कुमारींनादेखील दीक्षा घेण्याचा अधिकार आहे. स्त्रिया पुरुषांप्रमाणेच लिंगधारणा करतात. " कौटुंबिक जीवनात लिंगायत स्त्री यथेच्छ धर्मस्वातंत्र्य उपभोगते. डॉ. के. ईश्वरन् या संदर्भात म्हणतात, "शिवाची उपासना करताना कौटुंबिक आणि धार्मिक विधी व उत्सव समारंभात लिंगायत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने धार्मिक अधिकार वापरतात.

**देवता म्हणूनही गौरव:**

स्त्रियांच्या समान दर्जाच्या दृष्टीने शैक्षणिक, आर्थिक, राजकीय अथवा इतर कोणत्याही अधिकारापेक्षा धार्मिक / धर्मविषयक अधिकार हेच खरे, प्रमुख, महत्त्वाचे व प्रमाण मानण्याजोगे असतात. वीरशैव समाजाने स्त्रीवर्गाचा केवळ सर्वप्रकारची समानता देऊन गौरव केलेला नाही तर मध्ययुगातील काही स्त्रियांचा 'देवता' स्वरूपात स्वीकारही केलेला आहे अर्थात या स्वीकाराला बहुजन समाजानेदेखील मान्यता दिलेली आहे. बसवेश्वरांच्या समकालीन महिला 'अक्कमहादेवी' आणि 'दानम्मा' याची प्रतीक स्वरूपातील उदाहरणे होत. स्त्रीवर्गाचा असा सर्वोच्च गौरव लिंगायत समाजानेच केलेला आहे बसवेश्वरांचे समकालीन सहकारी सिद्धरामेश्वर यांनी 'नारी ही माया नसून ती प्रत्यक्ष कपिलसिद्ध मल्लिकार्जुनच आहे.' (देवताच आहे) असे गौरवोद्गार काढले आहेत. "

**स्त्री आणि शिक्षण:**

स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांचा व्यक्तिमत्त्व विकास यांमध्ये खूप घनिष्ठ संबंध आहेत. स्त्रियांचा व्यावसायिक व आर्थिक दर्जा यावरही शिक्षणाचा प्रभाव पडत असतो. मागरिट मॅरिनी या संदर्भात म्हणतात, "स्त्रियांची व्यावसायिकता आणि त्यांची शैक्षणिक अर्हता यांमध्ये महत्त्वपूर्ण संबंध आहेत. स्त्री जेवढे जास्त शिक्षण घेते त्या प्रमाणात तिची व्यावसायिक प्रतिष्ठा व आर्थिक क्षमता वाढते. बसवेश्वरांनी स्त्रीशिक्षणाचे मूलगामी व दूरगामी परिणाम जाणले होते. संपूर्ण कुटुंबाच्या रचनेवर स्त्रीशिक्षणाचे परिणाम होत असतात, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक अर्थशास्त्रज्ञही याच्याशी सहमत होतात. या संदर्भात मेरिनी पुढे म्हणतात, "अर्थशास्त्रज्ञांच्या मते शिक्षणामुळे स्त्रिची कुटुंबासंबंधीची उत्पादकता सुधारते. मुलांची गुणवत्ता, अपत्य गर्भनिरोधन, पतिचे अर्थार्जन व त्याचे आरोग्य यावरही त्याचा परिणाम होतो.”

लिंगायत समाजाने स्त्रियांना शैक्षणिक स्वातंत्र्य नि अधिकार दिलेले आहेत. स्त्री-शिक्षण हे लिंगायत समाजाचे एक वैशिष्ट्य ठरते. स्त्रीशिक्षण, स्त्री-प्रौढ शिक्षण, स्त्री-साक्षरता, स्त्रियांचे व्यावसायिक शिक्षण इत्यादी संकल्पनांना १२व्या शतकापासूनच महत्त्व प्राप्त झालेले आहे. याबाबतची पार्श्वभूमी व स्वरूप विशद करताना लल्लेश्वरी मूगी म्हणतात, "महात्मा बसवेश्वरांची पत्नी शरणी गंगाम्बिका यांच्या नेतृत्वाखाली कल्याणात ठिकठिकाणी स्त्रीशिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली होती. प्रौढ स्त्रियांसाठी कायक केंद्र (कार्यस्थळे) स्थापण्यात आली होती आणि त्यांमधून विविध कुटिरोद्योगांचे शिक्षण देण्यात येत असे. त्यांतील अनेकविध विभागांत त्या-त्या कायकातील निष्णात अशा व्यक्तींची देखरेखीसाठी नेमणूक केली गेली होती. सूतकताई विभागावर शरणी रेम्मव्वे, वेळूकाम शाखेवर शरणी बुरुड सातव्वा, सुतारकाम शाखेवर शरणी काळव्या अशा विविध व्यक्तींच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. तथापि शरण शरणींचा विशेष भर व रोख सूतकताई व विणकाम यांवर होता. हे कायक (उद्योग) त्यांनी सार्वत्रिक केल्याचे पुरावे त्यांच्या चरित्रात आणि साहित्यात मिळतात. " महात्मा गांधींच्या खादी ग्रामोद्योगाच्या चळवळीचे मूळदेखील १२व्या शतकातील लिंगायत चळवळीत आढळून येते. दुसरे म्हणजे ज्या स्त्रियांना शिक्षण केंद्रात जाऊन शिक्षण घेणे जमत नव्हते. अशा स्त्रियांच्या घरी जाऊन शिक्षण देण्याचे कार्य रेम्मव्ये यांच्या मार्गदर्शनाखाली होत होते. यावरून स्त्रीशिक्षणाचा त्यांन घेतलेला ध्यास व त्यासाठीच्या प्रयत्नांचे स्वरूप लक्षात येते,

**स्त्रियांची वाङ्मयनिर्मिती:**

धर्मग्रंथांचे पठण स्त्रियांनी करू नये अथवा त्यांना करता येणार नाही, अशा प्रकारच्या प्रतिगामी विचारांचे आजही समर्थन

केले जात आहे. तथापि याबाबतही बसवेश्वरांचे विचार व प्रयत्न योगदानकारक ठरलेले आहेत. या संदर्भात माते महादेवी म्हणतात, "धर्मग्रंथ अध्यापनाचे, ईश्वरी उपासनेचे, योगसाधनेचे आणि इतरांना आध्यात्म मार्गाचे मार्गदर्शन करणारे हक्क स्त्रियांना देण्यात आले होते. " बसवेश्वरांनी अनुभवमंटपामध्ये स्त्रियांना धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्यास परवानगी तर दिलीच; पण स्त्रियांच्या हातून वाड्मयनिर्मिती होईल असेही अनुकूल वातावरण तयार केले. परिणामतः १२व्या शतकात अनेक ख्यातनाम स्त्री-वचनकार उदयाला आल्या. लल्लेश्वरी मूगी यांनी 'संतिणी बसवयुगातील' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथात त्यांनी २१ शिवशरणींच्या जीवनकार्याचा तसेच वाङ्मयीन योगदानाचा परिचय करून दिला आहे. अक्कमहादेवी, नागलांबिका, गंगांबिका, निलांबिका, लिंगम्मा, लक्ष्यम्मा, रायम्मा, गंगम्मा, वीरम्मा, रेकम्मा, लकम्मा, सत्यक्का, मुक्तक्का, चोळावका, निब्यक्का, रेमव्वे, रेचव्वे, गोग्गव्वे, सोमव्वे, गुडुव्वे, काळव्वे, अम्मव्वे, वैजय्ये, पिटव्वे, परतारगौरी, बॉतादेवी व बिज्जलादेवी या काही प्रमुख स्त्री-वचनकार होत. यांपैकी अक्कमहादेवी यांची वचने तर लिंगायत वाड्मय तसेच कन्नड भाषेच्या समृद्धतेला पोषक ठरली. अक्कमहादेवी या भारतातील सर्वप्रथम महिला तत्त्वज्ञ, संत आणि साहित्यिक होत. अक्कमहादेवीना 'जगन्माता' व 'महायोगिनी' अशी अनेक विशेषणे आदरभावनेने लावली जातात अक्कमहादेवी यांच्या वचनसाहित्याचा आधुनिक कन्नड साहित्यिकांवरदेखील जबरदस्त प्रभाव पडलेला आहे. या संदर्भात डॉ. नंदिनी गुंडूराव म्हणतात, "आधुनिक काल अक्कमहादेवी की जीवनी, उसका साहित्य, उसकी उपासना पद्धती, चिंतन, वचनों का संपादन कन्नड साहित्यकारों तथा विद्वानों का प्रिय विषय रहा है। कन्नड लोकसाहित्य में तो उसकी कीर्ति दिगंत तक फैली है।

महिला वचनकारांची वाङ्मयीन वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करताना सदाशिवय्या म्हणतात, "नागलांबिका, गंगाबिका, अक्कमहादेवी, मुक्तांबा यांसारख्या कवयित्री व स्त्री-प्रेषितांचा अभिमान बाळगणारा लिंगायत समाज हा स्त्री-शिक्षणाला केवळ प्रोत्साहनच न देता त्याचा आग्रहही धरतो. १२व्या शतकातील लिंगायत पुनरुज्जीवन काळामध्ये या महान स्त्रियांनी धर्माच्या प्रसारामध्ये अमूल्य सेवा बजाविलेली आहे. या स्त्रियांच्या कन्नड भाषेतील रचना मोहकता, सुबोधता, अर्थगर्भितता, शब्दसौंदर्य आणि विचार सखोलता यांची उदाहरणे मानली जातात. म्हणजेच या महिला वचनकारांची वाङ्मयनिर्मिती ही साहित्यशास्त्र व सौंदर्यशास्त्र यांच्या निकषांना उतरणारी ठरली आहे. यावर भाष्य करताना डॉ. ईश्वरन् म्हणतात, "बहुतांशी भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात स्त्रियांचा सहभाग अल्प आहे; परंतु १२ व १३ व्या शतकांतील कर्नाटकात ५० वर्षीच्या कालावधीत लिंगायत चळवळीच्या माध्यमातून ३४ स्त्री-साहित्यिक पुढे आल्या. त्यांनी लिहिलेल्या वचन व भक्तिगीतामुळे लिंगायत धार्मिक सामाजिक क्रांती समृद्ध झाली.

**स्त्रिचा घटस्फोटविषयकचा अधिकार ( जगातील पहिली घटना ) :**

पतिने जर दिलेल्या वचनाचे पालन केले नाही तर स्त्रीदेखील आपला समतेचा हक्क बजावू शकते हे अक्कमहादेवी यांनी १२ व्या शतकातच जगाला दाखवून दिलेले आहे. वीरशैव धर्माने स्त्रिला सन्मानपूर्वक दिलेल्या समतेच्या अधिकाराचे जगातील पहिले ऐतिहासिक उदाहरण प्रस्तुत संदर्भात नमूद करण्याजोगे आहे. कर्नाटक राज्याचे माजी मुख्य अभियंता शिवाप्पा बाळेकुंद्री आपल्या भाषणात म्हणाले, "१२ व्या शतकात कौशिक राजाने दिलेले आपले वचन न पाळल्यामुळे अक्कमहादेवीने त्याचा म्हणजे आपल्या पतिचा त्याग करून वीरशैव धर्माचा स्त्री-पुरुष समतेचा हक्क बजाविला. या घटनेला भारताचा इतिहास साक्षी आहे. "

**विधवांकडे पाहण्याचा दृष्टिकोन :**

लिंगायत समाजाचा विधवा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत उदार व विशाल स्वरूपाचा आहे. लिंगायत समाजव्यवस्थेत पूर्वीपासूनच विधवांनादेखील मानाचे स्थान दिलेले आहे. हिंदू समाजात विधया स्त्रियांवर अनेक धार्मिक व सामाजिक बंधने लादलेली आहेत. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी तर विधवेवरील हिंदूची बंधने अतिशय कडक स्वरूपाची होती. तथापि लिंगायत समाजाने विधवाबाबत व्यापक दृष्टिकोन बाळगलेला आहे. हिंदू आणि लिंगायत समाजातील विधवा स्त्रियांवरील बंधनांचे स्वरूप विशद करताना डॉ. ईश्वरन् म्हणतात, "ब्राहाण संस्कृतीमध्ये विधवेला अशुभ मानले जाते. दिवसारंभावेळी तिचे दर्शन झाल्यास दिवसभराची कार्यहानी होते, अशी समजूत प्रचलित आहे. ब्राह्मण विधवा कोणत्याही शुभकार्यात अथवा समारंभात सहभागी होऊ शकत नाही. अशा प्रसंगात तिने आपली उपस्थिती जाणवू देऊ नये, असे तिच्यावर बंधन असते. याच्या पूर्ण विरोधात लिंगायत विधवा मुक्तपणे विवाह समारंभ, पूजा व धार्मिक उत्सवांमध्ये निःसंकोचपणे आणि पूर्ण अधिकाराने भाग घेऊ शकते. "

विधवा स्त्रीबाबतचा लिंगायत धर्माचा दृष्टिकोन स्पष्ट करताना 'डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर' मध्ये असे म्हटले आहे. "लिंगायत विधवा कोणत्याही रंगाची साडी परिधान करू शकते. अंतर्वस्त्रे व दागिने वापरू शकते. मात्र ती नथ, मंगळसूत्र व पायांतील जोडवी वापरत नाही" लिंगायत समाजामध्ये विधवांना अपवित्र, अपात्र, अस्पृश्य मानलेले नाही. पतिनिधनानंतर केशवपन किंवा सती जाणे हे अनावश्यक मानलेले आहे. याबाबत माते महादेवी म्हणतात, "इतर अनेक समुदायांमध्ये दृढ स्वरूपात प्रचलित असलेल्या कल्पनेच्या बरोबर विरुद्ध लिंगायत समुदायांत स्त्रीला अशुभलक्षणी मानले जात नाही. तिच्या पतीच्या मृत्यूनंतर मंगळसूत्राव्यतिरिक्त तिने कोणत्याही दागिन्याचा त्याग करण्याची किवा केशवपन करण्याचीही गरज नसते. या दोन्ही प्रथांचे महान समाजसुधारक बसवांनी फार पूर्वीच समाजातून निर्मूलन केलेले आहे. "

**विधवा पुनर्विवाहाचे आग्रही समर्थन:**

पत्नीच्या निधनानंतर जर पुरुष पुनर्विवाह करू शकतात, तर स्त्रीदेखील पुनर्विवाहाच्या या अधिकारापासून वंचित का राहावी? अशी बसवेश्वरांची भूमिका होती. त्यांनी आपल्या या भूमिकेचेही व्यावहारिक समर्थन केलेले आहे. म्हणूनच रेजिनॉल्ड एंथोवेन म्हणतात, "विधवाविवाहाबद्दल बसव आग्रही असत. आजदेखील विधवाविवाह संमत आहेत. तेव्हा लिंगायत धर्माने विधवांनादेखील धार्मिक व सामाजिक अधिकार देऊन समाजात आदराचे व मानाचे स्थान दिलेलेआहे. इतर समाजांपेक्षा विधवा स्त्रिकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन आणि त्यांना प्रत्यक्षात दिली जाणारी वागणूक निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**वेश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन:**

विधवांप्रमाणेच वेश्यांकडे पाहण्याचा लिंगायत समाजाचा दृष्टिकोन व्यापक आहे. बसवेश्वरांनी वेश्यांकडे वाईट, अनैतिक मानून दुर्लक्ष केलेले नाही, वेश्यादेखील समाजाचा एक महत्त्वाचा घटक असून त्यांचा विकासही आवश्यक असल्याची बसवेश्वरांची भूमिका होती. वेश्यांच्या सुधारासाठी पुनर्वसन केंद्रे सुरू करण्याचा विचार महाराष्ट्र सरकार करीत असल्याचे वृत्त दैनिक सकाळमध्ये अलिकडे प्रसिद्ध झाले आहे. त्या वृत्तात वैश्यांच्या वयोगटानुसार त्यांना दरमहा द्यावयाच्या आर्थिक मदतीचा उल्लेख केला आहे. अर्थात केवळ आर्थिक प्रश्नाची सोडवणूक म्हणजे जीवनसमस्यांची सोडवणूक नव्हे. आर्थिक मदत दिली म्हणजे वेश्यांचे पुनर्वसन साध्य होईल असे नाही, तर त्यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजनांचा स्वीकार झाला पाहिजे. या दृष्टीने महात्मा बसवेश्वरांनी कार्यवाहित आणलेल्या योजना आजदेखील मार्गदर्शक आणि निष्पत्तीदायक ठरतात.

१२ व्या शतकात बसवेश्वरांनी आणि त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी वेश्यांना मार्गदर्शन करणे, त्यांचा विवाह घडवून आणणे, त्यांच्यासाठी अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून देणे, त्यांना आश्रय देणे इत्यादी उपक्रम राबवून वेश्यांना समाजात पुन्हा मानाचे स्थान मिळवून दिलेले आहे. धार्मिक गोष्टींत रुची असलेल्या वेश्यांना धर्माची दीक्षाही दिलेली आहे. यासाठी त्यांनी वेश्यांची पुनर्वसन संस्थादेखील सुरू केली होती.

बसवेश्वरांनी सुरू केलेल्या वेश्या पुनर्वसन संस्थांच्या कार्यप्रणालीबाबत माते महादेवी म्हणतात, "विधवांचे धर्मांतरण आणि पुनर्वसन यांचा बसवांनी केलेला विचार ही एक महत्त्वाची सामाजिक सुधारणा होय. जंगम व प्रसारक यांच्याद्वारे वेश्यावस्तीतील स्त्रियांमध्ये नैतिक मूल्यांचा प्रचार केला जाई. दारिद्र्यामुळे या पापमार्गाने आपली उपजीविका करणाऱ्या स्त्रियांना इतर कायक (व्यवसाय) पुरविले जात. मानसिक दुर्बलता आणि शारीरिक वासना यांचे बळी असलेल्या स्त्रियांना तरुण पुरुषांबरोबर विवाह करण्यास प्रोत्साहन दिले जाई ज्या वेश्या प्रखर धार्मिकतेकडे वळल्या होत्या, त्यांना निवारा व अनुभव मंटपामध्ये आत्मिक उन्नतीचे शिक्षण दिले जाई." तेव्हा वेश्यांच्या जीवनाचा व त्यांच्या विविधांगी प्रश्नांचा बसवेश्वरांनी किती सूक्ष्मपूर्वक विचार केला होता, याची कल्पना येऊ शकेल

सारांश :

लिंगायत धर्माचा आणि समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पूर्वीपासूनच इतर समाजांशी तुलना करता अधिक उदार, व्यापक व समतापूर्वक राहिलेला आहे. बालिका, किशोरी, तरुणी, प्रौढा, वृद्धा, अविवाहिता, विवाहिता, घटस्फोटिता, परित्यक्ता व वेश्या अशा सर्वच अवस्थांतील स्त्रियांना चांगली व समतापूर्ण वागणूक देण्याचा आग्रह १२ व्या शतकात बसवेश्वरांनी धरलेला होता. सर्व प्रकारच्या स्त्रीजीवनाकडे बसवेश्वरांनी लक्ष पुरविले होते, हे त्यांच्या स्त्रीविषयक विचारांचे प्रभेदक वैशिष्ट्य होय. या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वर हेच स्त्री मुक्ती संकल्पनेचे जनक ठरतात.

**संदर्भ :**

1. कामत अशोक, "महात्मा बसवेश्वर", सत्संग प्रतिष्ठान, पुणे, १९९९.

२. पाठक प्रभाकर, "चेतनार्चिंतामणी श्रीबसवेश्वर" सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००५.

३. मेनकुदळे अशोक, "बाराव्या शतकातील आय समाजसुधारक महात्मा बसवेश्वर". सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००३.

४. पाटील भिमराव (संपा.), "युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर", ब्रह्माजीराव पाटील प्रकाशन, लातूर, २००६.

५. अभ्यंकर शंकर (संपा.), "भारतीय संत (भक्तिकोश) खंड-२", आदित्य प्रतिष्ठान, १९९८.

६. काळे कल्याण, रा.श. नगरकर, "संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९२.

७. पठाण यू.म., "मुध्ययुगीन संतसाहित्य: काही आयाम स्वरुप", स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, जून २००३.

८. मेणसे कृष्णा, "श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर: एक चिंतन", लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९६.

९. शाबादे रेवण, "करुणाधन महात्मा बसवेश्वर", सुविद्या प्रकाशन, सोलापूर, नोव्हेंबर २००९.

१०. घुगरे सूर्यकांत, "वीरशैव व इतरधर्म आणि समाज", साधना प्रकाशन, कोल्हापूर, १९९९.

११. घुगरे सूर्यकांत, "जगज्योती महात्मा बसवेश्वर", महाराष्ट्र बसव समिती पब्लिकेशन, नांदेड, २००३.

12. डॉ उद्धव न कांबळे ,''महात्मा बस्वेश्वराचे समग्र तत्त्वज्ञान'' ( शोधप्रबंध ),सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे ,२०१८.